**MHNG100000972024**

नि.दि.दा. क्र. १८ / २०२४
संजना + २ विरुध्द शशिकांत +१

## निशाणी क्र. ५ वर आदेश

अर्ज, खुलासा तसेच दावा व लेखीजबाब दाव्यातील दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले. विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

२. **वादीचे थोडक्यात असे म्हणणे की–**

दावा हा घोषित होउन मिळणे करिता व निरंतरच्या मनाई हुकुमा करिता दाखल आहे. मृत्यु पत्र दि.१७.०१.२०१६ हे मयत रामनारायन केसकर युानी तयार केले. वादी व प्र.वादी क्र १ यांना स्थावर मालमत्ता व जंगम मिळकत चा लाभ त्यांना त्यांचे हिस्से पुरता मिळणार आहे. प्र.वादी क्र. १ यांना दारुचे व्यसन आहे. त्यांच्या पासुन वादी यांना त्रास आहे. त्यांनी दाव्यात त्याबाबत नमुद केले आहे. हिंदु वारसा कायदया अन्वये प्र.वादी क्र. १ हे एकटे लाभ मिळणेस पात्र नाही. म्हणुन वादींनी दावा हा दाखल केला आहे. प्र.वादी क्र. १ हे त्यांना वारसा प्रमाणपत्र मिळाल्यास व रक्कम मिळाल्यास , वादींचे नुकसान होणार आहे.

३. वादींचे कधीही न भरुन निघणारे अपरिमित असे नुकसान होईल. अशा परिस्थितीत वादींना प्रतिवादींविरुध्द निरंतरचा मनाई हुकूम मिळणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक व गरजेचे आहे. प्रथम दर्शनी केस ही वादीची आहे. न्यायाचा समतोल देखील वादींच्याच लाभत आहे. सबब त्यांनी अर्ज मंजुर व्हावा अशी विनंती केली.

४. प्र.वादी क्र १ यांनी कोणतेही कार्यवाही केली नाही. म्हणुन दि.०३.०४.२०२४ रोजी नि.क्र. १ वर आदेश पारित करुन एकतर्फा प्रकरण चालवावे असा आदेश पारित केला. प्रतिवादी क्र. २ यांनी नि.क्र. १३ अन्वये कैफियत व अर्जास खुलासा दाखल केला.

५. मयत रामनारायण चीराकी यांचे दि.१७.०१.२०१६ चे मृत्युपत्र बाबत

कथन करण्यास नकार दिला. परंतु ची त्यांची भविष्य निर्वाह योजनेची रक्कम बाकी आहे आणि ती त्यांचे कडे आहे, असे त्यांनी कथन केले. तसेच मयत रामनारायण यांनी त्यांची पत्नीचे नाव र्निदेशित केले होते. परंतु त्यांची पत्नी देखील मयत झाली आहे. त्यामुळे तिचे वारस हे रक्कम मिळणेस पात्र आहे . इतर सर्व कथन त्यांनी नाकरले.

६. परस्पर विरोधी कथन व युक्तीवाद अन्वये खालीलप्रमाणे मुद्दे माझे समक्ष उपस्थित होतात व त्यावरील कारणमिमांसेसह निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादीच्या हक्कात प्रथम दर्शनी केस आहे काय ? | ...नाही |
| २. | सुविधेची तौलनीक बाजु वादीचे हक्कात आहे काय ? | ...नाही |
| ३. | तात्पुरता मनाई हुकूम न दिल्यास वादीचे न भरुन निघाणारे नुकसान होईल काय ? | ...नाही |
| ४. | काय आदेश ? | अंतिम आदेश प्रमाणे |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र.१ ते ४ बाबत –**

**७.** मुद्दा क्र.१ ते ३ हे ऐकमेकांशी निगडीत असल्यामुळे, विवेचन करणे सोईचे व्हावे म्हणून व लेखनाची पुनःरावृत्ती टाळण्यासाठी सदर मुद्दे विवेचना करिता एकत्रीत घेण्यात आले.

८. वादी यांनी त्यांची भिस्त खालील दस्तऐवजांवर ठेवलेली आहे.

| अ.क्र. | दस्तावेज | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| १. | मृत्युपत्र | नि.क्र. ४ दस्त क्र.१ |
| २. | पत्र | नि.क्र. ४ दस्त क्र.२ |

| | | |
|---|---|---|
| ३. | पत्र | नि.क्र. ४ दस्त क्र. ३ |
| ४. | पत्र | नि.क्र. ४ दस्त क्र. ४ |
| ५. | पत्र | नि.क्र. ४ दस्त क्र.५ |
| ६. | पत्र | नि.क्र. ४ दस्त क्र.६ |
| ७. | आधारकार्ड वादी क्र १ ते३ | नि.क्र. ४ दस्त क्र.७ ते ९ |

**९.** उभय पक्षांचा युक्तीवाद ऐकला. वादी यांनी दाव्यात वंक्षवृक्ष नमुद केला आहे. तसेच मयत रामनारायण यांचे मिळकत बाबत त्यांनी मृत्युपत्र केले असे नमुद केले आहे. मृत्युपत्र हे नि.क्र. ४ दस्त क्र १ अन्वये दाखल आहे. सदर दस्ताचे अवलोकन केले असता, त्यामध्ये मिळकतीची विल्हेवाट कशी लावावी हे नमुद आहे. दस्त क्र २ हे वादी यांनी प्र.वादी क्र २ यांना दिलेले पत्र आहे. दस्त क्र. ३ हे देखील हे पत्र आहे. दस्त क्र ४ हे प्र.वादी क्र.१ यांना डब्लुसीएल यांना दिलेले पत्र आहे. त्यामध्ये वारस दाखला आणावा असे नमुद केले आहे. दस्त क्र ५ हे देखील वारस दाखला आणावा , हेच नमुद केले आहे. दस्त क्र . ६ हे देखील दस्त क्र. ४ व ५ संबंधीत आहे.

**१०.** वादी यांनी नाते संबंध नमुद केले आहे. वादी क्र १ हि शशिकांत यांची पत्नी आहे. प्र.वादी क्र. १ यांना दारुचे व्यसन आहे, असे वादींचे कथन आहे. त्यांनी ब–याच घटना नमुद केल्या आहेत. थोडक्यात वादी क्र.१ व प्र.वादी क्र. १ यांचेत बेबनाव आहे. कौंटुबिक वाद आहे हे दिसुन येते. वादी यांनी प्र.वादी क्र १ यास मयत रामनारायण यांची रक्कम, प्र.वादी क्र.२ यांनी देऊ नये अशी विनंती केली आहे. प्र.वादी क्र. हे नियमा नुसार वारसांना रक्कम देण्याचे कथन करित आहे. प्र.वादी क्र २ हे रक्कम हि कशी देणार आहे? हे त्यांनी लेखी जबाबात कथन केले आहे. मयत यांनी शांतादेवी यांना वारस म्हणुन र्निदेशित केले होते. परंतु, त्या देखील मयत झाल्या, असे प्र.वादी क्र २ चे कथन आहे. परंतु,त्याबाबत चे दस्त अभिलेखावर दाखल नाही. प्र.वादी क्र २ हे नियमानुसार कार्यवाही करत असुन, ते रक्कम त्यांचे कडे आहे असे कथन करित आहे.

**११**. उभयातांमध्ये, म्हणजे वादी क्र.१ व प्र.वादी क्र.१ मध्ये वाद आहे, असे दाव्यातील नमुद मजकुर अन्वये दिसुन येते. परंतु त्यासाठी प्र.वादी क्र २ यांना र्निर्देश देता येतील काय ? कारण प्र.वादी क्र २ हे कार्यालय आहे. ते नियमा नुसार कार्यवाही करणार, असे कथन करित आहे. ते नियमबाहय कार्यवाही करणार नाही असे दिसुन येते. वादी यांची प्रथमदर्शन केस कशी? हे अभिलेखावरील दाखल दस्ताऐवजांवरुन दिसुन येत नाही. न्यायाची तौलीक बाजु ही वादी यांच्या हक्कात नाही. वादींचे काय नुकसान होणार आहे, त्यासाठी त्यांना इतर कायदेशिर मार्ग किंवा पर्याय उपलब्ध आहे. अशा एकंदरीत परिस्थितीवरुन अर्ज हा मंजुर होण्यास पात्र नाही, असे माझे मत नोंदवितो. सबब मी मुद्दा क्र.१ ते ३ चा निष्कर्ष नकारार्थी देत आहे. सबब, मुद्दा क्र. ४ करिता मी खालील प्रमाणे आदेश पारीत करतो.

**<u>आदेश</u>**

- अर्ज हा खारीज करण्यात येतो.

दिनांक १८.०७.२०२४ (रा.भा.डोळे)
उमरेड सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, उमरेड

**: प्रमाणपत्र :**

मी प्रमाणित करतो की, सदर पी.डी.एफ. संचिकेच्या मजकुरातील शब्द न शब्द मुळ न्यायनिर्णय / आदेशाप्रमाणे आहे.

लघुलेखकाचे नांव – आर.एल. जाधव

न्यायालयाचे नांव – सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर व न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, उमरेड

पी.डी.एफ. अपलोड केल्याचा दिनांक – २२.०७.२०२४

स्वाक्षरीत/–

लघुलेखक श्रेणी –३